सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र २२८४५२३०
Email ID :comp.fd@maharashtra.gov.in

वित्त विभाग, मंत्रालय (विस्तार), दालन क्र.३५७,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

क्र.सीओएम-२०२३/प्र.क्र.१६/संगणक कक्ष,

दिनांक : २४ जुलै, २०२३

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (ले.व को.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त, राज्य कर, जीएसटी भवन, माझगांव, मुंबई.
५. विशेष आयुक्त, राज्य कर, जीएसटी भवन, माझगांव, मुंबई.
६. संचालक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, मुंबई.
७. उप सचिव (उद्योग-४), उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. उप सचिव (कोषा. प्रशा-४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. उप सचिव (कराधान), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. संचालक, लेखा व कोषगारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. सह आयुक्त, राज्य कर, जीएसटी भवन, माझगांव, मुंबई.

**विषय :- प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या ७५ व्या बैठकीचे इतिवृत्त...**

**महोदय,**

वित्त विभाग व वित्त विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांकरिता संगणकीकरण विषयक प्रस्तावांवर निर्णय घेण्याकरिता प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) गठीत करण्यात आलेली आहे.

२. सदर समितीची ७५ वी बैठक बुधवार, दि. १२ जुलै, २०२३ रोजी दु. ०३.०० वाजता सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा समिती अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

३. सदर बैठकीचे इतिवृत्त माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सोबत जोडले आहे.

आपला,

**(आ. सु जोगळेकर)**
**कक्ष अधिकारी, वित्त विभाग.**

**प्रत,**

१. सचिव (वि. सु.) यांचे स्वीय सहायक.
२. निवडनस्ती (संगणक कक्ष).

प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) ७५ व्या बैठकीचे इतिवृत्त.

वित्त विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीची ७५वी बैठक सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दि. १२-७-२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. त्यांचे दालन क्र.५०५, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे पार पडली.

प्रस्तुत बैठकीस समितीचे पुढील सदस्य आणि अन्य संबंधित पदाधिकारी हजर होते.

१.श्रीमती शैला ए., सचिव (वि. सु.), वित्त विभाग तथा अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती.

२.श्री. प्रमोद ड्रुमरे, राज्यकर सह आयुक्त, आर्थिक बुद्धिसंपदा कक्ष, माझगांव, मुंबई.

३.श्री.वैभव राजेघाटगे, संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य,

४.श्री.विनायक धोत्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

५.श्री.मंदार केळकर, उप सचिव, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.

६.डॉ. राजेंद्र गाडेकर, उप सचिव, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.

७.श्री.लक्ष्मीकांत गर्जे, टेक्निकल डायरेक्टर, NIC

८.श्री. क. सि. बडगुजर, अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय. मुंबई.

९.श्री.राजेंद्र टंकसाळे, Consultant, DIT

१०.श्री. शशांक चव्हाण, कक्ष अधिकारी, उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

बैठकीत खालील विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले.

**Agenda- 1**

**Proposal for Administrative and Financial approval for procurement of AMC Support for various Hardware and Software in the BIDW Project for the period of Six months.**

This proposal was received from MGSTD, with the approval of CST for the approval of the committee. It was informed to the committee that,

1. Economic Intelligence Unit (EIU) of MGSTD is involved in analysis of data for identification of risk parameters and areas of possible tax evasion through Business Intelligence and Data Warehouse (BIDW) project. This project uses various software and hardware and the Annual Maintenance Contract (AMC) of these products are required to get timely replacement of faulty products and to get OEM support to resolve critical issues to ensure business continuity. It is critical for smooth operation of the BIDW system and availability of BIDW solutions which are necessary for continuous analysis of GST data in view of effective GST implementation.
2. The Department had submitted proposal to PIC for procurement of AMC for the period 01.07.2022 to 30.06.2023. Accordingly, in the 67$^{th}$ meeting held on 14/06/2022 PIC had granted Administrative and financial approval for procurement of AMC for hardware and software of BIDW Project for the period 01.07.2022 to 30.06.2023 at a cost of Rs.1,18,83,568/- (Rupees one crore eighteen lakh eighty three thousand five hundred and sixty eight only), plus applicable taxes.
3. The list of Hardware and Software for which AMC is required are listed below.

   A. HP Hardware- 17 servers and one storage
   B. HP Data Protector Software

C. HP EMS Software
D. RHEL Operating System, Linux

4. Department is in the process to migrate BIDW system of MGSTD on cloud Environment. The Cloud migration and stabilization may take three to six months approximately, therefore AMC of HP and RHEL is required during the migration for the period of Six months only. Once the entire infrastructure is moved to Cloud environment then the AMC of above mentioned HPE Hardware & Software (Component A, B and C of above table) & RHEL Operating system (component D of above table) will not be required on cloud environment.
5. Since the AMC validity is expired on 30th June 2023, it is now necessary to renew the AMC for the upcoming period of six months from the date of work order. The contract for AMC of these products will be awarded by following due tendering process.
6. To procure the AMC of the Hardware and Software products, AMC quotations are obtained from Original Equipment Manufacturers (OEMs) for the period of Six months from 01.07.2023 to 31.12.2023. Accordingly, total cost of procurement of AMC is as follows.

| Sr. No. | AMC Component | OEM Quotation Amount (Rs.) |
|---|---|---|
| 1 | HP Hardware EMS & Software Data Protector Software | 30,38,750 |
| 2 | RHEL Operating System | 9,09,055 |
| | Total AMC price | 39,47,805 |
| | Taxes | As applicable |

**Proposal for consideration before PIC**
Hence it is requested that Administrative and Financial approval may be granted for the Procurement of AMC of BIDW project for the period of six months, for HP hardware, EMS software, Data protector Software and RHEL Operating System by following due tendering process, for the period from 01.07.2023 to 31.12.2023 at a cost of Rs. 39, 47,805/- (Rupees Thirty nine lakh Forty seven thousand Eight hundred five only), plus applicable taxes thereon.

**Decision**
PIC approved the procurement of AMC of BIDW Project for HP hardware, EMS software, Data protector Software and RHEL Operating System by following due tendering process, for the period of six months from the date of work order at a cost of Rs. 39, 47,805/- (Rupees Thirty nine lakhs Forty seven thousand Eight hundred five only) (Excl. GST) plus GST applicable.

## Agenda- 2

(अ) संचालनालय, लेखा व कोषागारे यांचेमार्फत कार्यान्वित संगणकीय प्रणालींच्या सर्व समावेशक तांत्रिक बाबी हाताळण्यास्तव पॅनलवरील सल्लागार संस्थेकडून घ्यावयाच्या २ वरिष्ठ सल्लागारांच्या मानधनावरील रुपये ५,५४,४००/- (अधिक कर) इतक्या मासिक खर्चास मान्यता देणेबाबत. आणि

(ब) संचालनालय, लेखा व कोषागारे यांचेमार्फत कार्यान्वित संगणकीय प्रणालींच्या सर्व समावेशक तांत्रिक बाबी हाताळण्यास्तव २ वरिष्ठ सल्लागार उपलब्ध करुन देण्यासाठी पॅनलवरील सल्लागार संस्थांपैकी सुयोग्य संस्थेची निवड करणेबाबत.

अपर मुख्य सचिव (ले. व को.) वित्त विभाग यांचेकडून प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या मान्यतेस्तव खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

१. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन व संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत संगणकीकरणाच्या दृष्टीने बिम्स, बिलपोर्टल, ट्रेझरीनेट, सेवार्थ,निवृत्तीवेतनवाहिनी, GRAS, कोषवाहिनी, अर्थवाहिनी, वेतनिका इ. १० संगणकीय प्रणाली संयुक्तरित्या राबविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे HRMS, Mahakosh, Store Verification, Exam Module, E-Tapal इ. प्रकल्पांवर in house काम सुरु आहे. उपरोक्त प्रणालींचे व्यवस्थापन प्रयोजनार्थ संचालनालय स्तरावर वेळोवेळी ई- टेंडर, आरएफपी, MOU, Legal Agreements , Service Level agreements इत्यादी संदर्भात कामकाज विहीत कालमर्यादेत पूर्ण करणे क्रमप्राप्त ठरते. तसेच उपरोक्त विविध प्रणालींचे व्यवस्थापन दरम्यान Managed Hosting, Security Audit , Cyber Security, Licenses Renewal, Service Level Agreements Monitoring इत्यादी स्वरुपाचे तांत्रिक कामकाज देखील वेळोवेळी पार पाडणे क्रमप्राप्त ठरते.

२. त्याचप्रमाणे MahaIT व राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्याकडून प्रणालींचे विकसन करुन घेणे, शासनाने वेळोवळी सुधारित केलेल्या नियमांच्या अनुषंगाने सदर बाबींचा प्रणालींमध्ये समावेश करणे, मेसर्स टीसीएल यांचेकडून मॅनेज्ड होस्टिंगच्या अनुषंगाने आवश्यक सुविधा उपलब्ध करुन घेणे, त्यामध्ये श्रेणीवाढ करणे किंवा घट करणे, या सारख्या बाबींवर तांत्रिक दृष्ट्या संनियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक वेळी मेसर्स टीसीएल यांच्या कडून श्रेणीवाढ करण्याचे प्रस्ताव सादर केले जातात व संचालनालय, लेखा व कोषागारे स्तरावर या तांत्रिक बाबींची आवश्यकता असल्याबाबत खात्री करण्यासाठी, तसेच MahaIT कडे सोपवल्या जाणाऱ्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी व तांत्रिक समन्वय ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारचे तांत्रिक मनुष्यबळ संचालनालयाच्या उपलब्ध नाही. त्यामुळे संचालनालय, लेखा व कोषागारे स्तरावर संचालनालयाच्या वतीने अशा प्रकारचे तांत्रिक कामे करण्यासाठी तांत्रिक मनुष्यबळ असणे आवश्यक आहे.

३. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे, MahaIT आणि M/s TCL यांच्याशी प्रणालीच्या अनुषंगाने तांत्रिक दृष्ट्या समन्वय साधण्याकरिता व खालील नमूद बाबींकरिता संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना तांत्रिक माहिती व त्याबाबत योग्य सल्ला देणे तसेच त्याबाबत योग्य प्रकारे समन्वय साधण्याकरिता सल्लागार म्हणून तांत्रिक मनुष्यबळ नियुक्त करुन त्यांच्याकडून खालील कामे करुन घेणे प्रस्तावित करण्यात आलेले आहेत.

I. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे व MahaIT, तसेच विविध Stake Holders यांच्याकडून येणाऱ्या विकसनाच्यां तांत्रिक बाबींची पडताळणी व विकसन करुन घेण्याच्या दृष्टीने संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत त्यांच्याशी समन्वय साधणे.

II. e-Governance Programs (IT Project) राबविण्यात येणाऱ्या विविध संगणकीय प्रणाली व माहिती तंत्रज्ञानामधील प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने अधिक कार्यक्षमता व पारदर्शकता निर्माण करणे.

III. MahaIT Team ला तांत्रिक अडचणी उद्भवल्यास त्यांचे संचालनालयाच्यावतीने निराकरण करणे.

IV. संचालनालयाच्या आवश्यकतेनुसार तांत्रिकदृष्ट्या विकसनाच्या (requirement) बाबीं MahaIT team कडून विकसित करुन घेणे.

V. संचालनालयास Managed Hosting, संगणकखरेदी, प्रणालीमध्ये सुधारणा, आवश्यकतेनुसार निविदा तयार करणे व वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन करणे.

VI. पुढील वर्षांमध्ये वित्त विभाग व संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत सुरु असणाऱ्या सर्व संगणकीय प्रणाली राजस्थानच्या धर्तीवर Integrated Financial Management System अंतर्गत एकाच Platform वर आणणे आवश्यक असून, त्या अनुषंगाने आवश्यक ते तांत्रिक सहाय्य उपलब्ध होण्याच्या दृष्टीने व त्याकरिता आवश्यकता असल्यास निविदेची प्रक्रिया करणे कामी मदत करणे.

VII. वित्त विभाग व संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रणालींच्या Security Audit & Performance Test करण्याकरिता RFP तयार करणे व त्यानंतर अहवालाप्रगाणे प्रणालींमध्ये सुधारणा करुन घेणे.

VIII. RFPs, Tender Documents, Contracts, Agreements, Memoranda इत्यांदीचे मसूदीकरण करण्यासाठी विधी विषयक सल्ला व मार्गदर्शन आणि सहाय्य करणे.

IX. संचालनालय अधिनस्त संगणकीकरणाच्या दृष्टीने आढावा घेणे. Software & Hardware, इत्यादीबाबत सर्व माहिती उपलब्ध करुन घेणे. त्यामध्ये कोणत्या प्रकारे सुधारणा करणे याबाबत अहवाल सादर करणे. त्यानुसार नवीन तंत्रज्ञानाशी सुसंगत असणाऱ्या Software & Hardware, तांत्रिक मनुष्यबळ, त्याची अंमलबजावणी, त्यामध्ये सुलभीकरण, सुसूत्रीकरण, इत्यादीबाबत अहवाल सादर करणे.

X. तसेच (a) Strategic Vision and Roadmap, (b) Database Management and Operating Model (c) Data Interpretation & Data analytics यासाठी भविष्यवेधी धोरण व कृति आराखडा तयार करणे.

४. माहिती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन, यांच्या दिनांक ०९/०५/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिनांक २०/०३/२०१८ ते दिनांक १९/०३/२०२३ पर्यन्त IT Projects साठी पुढील ०६ संस्थांची निवड करण्यात आलेली आहे. (१) M/s Deloitte, (२) M/s Ernst & Young, (३) M/s Grant Thornton, (४) M/s KPMG, (५) M/s PwC, (६) M/s Wipro. तसेच सदर शासन निर्णयान्वये वेगवेगळ्या तांत्रिक मनुष्यबळाचे दर देखील निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार Senior Consultant यासाठी दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र | तांत्रिक मनुष्यबळाचा तपशिल | अर्हता | दर रक्कम रुपये (प्रती महिना) (करा व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|
| १ | Senior Consultant | ५ वर्षे ते ८ वर्षे | २,७७,२००/- |

५. सामान्य प्रशासन विभाग, (माहिती तंत्रज्ञान) यांच्या दिनांक २४-४-२०२३ च्या परिपत्रकानुसार उपरोक्त सहा सल्लागार संस्थांना व त्यांचेकडून घ्यावयाच्या तांत्रिक मनुष्यबळाच्या दरांना दिनांक १९ सप्टेंबर, २०२३ पर्यंत किंवा पुढील Empanelment यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

६. सामान्य प्रशासन विभाग, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.१९/०३/२०२१ च्या शासन निर्णयान्वये "Departments need to finalize the Scope of work for consultancy with concurrence of ACS/ PS/Secretary of concerned Department" अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संचालनालयाने प्रस्तावित केलेल्या Scope of Work ला अपर मुख्य सचिव (ले व को) यांनी मान्यता दिलेली आहे.

७. सदर मान्यतेनंतर लेखा व कोषागारे संचालनालयाकडून सर्व सहा नामनिर्देशित सल्लागार संस्थांना दि.२७.०६.२०२३ रोजीच्या ई-मेलद्वारे Scope of Work कळविण्यात आला होता आणि Resources च्या CV सह प्रकल्प अंमलबजावणी समितीसमोर विस्तृत सादरीकरणाकरिता एक आठवड्याची नोटीस देवून कळविण्यात आले होते, असे संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय यांनी बैठकीत सांगितले.

## सादरीकरण

निमंत्रित ६ पंजीकृत संस्थापैकी (१) M/s Ernst & Young, (२) M/s Grant Thornton, (३) M/s KPMG या तीन संस्थांचे प्रतिनिधी प्रकल्प अंमलबजावणी समितीसमोर विस्तृत सादरीकरणासाठी उपस्थित होते. सुरुवातीला संचालक, लेखा व कोषागारे यांनी प्रस्तावाबाबत प्रकल्प अंमलबजावणी समितीला वस्तुनिष्ठ माहिती दिली. त्यानंतर (१) M/s Ernst & Young, (२) M/s Grant Thornton, (३) M/s KPMG या तीन संस्थांच्या प्रतिनिधींनी प्रकल्प अंमलबजावणी समितीसमोर विस्तृत सादरीकरण केले.

## निर्णय

अ) संचालनालय, लेखा व कोषागारे यांचेमार्फत कार्यान्वित संगणकीय प्रणालींच्या सर्व समावेशक तांत्रिक बाबी हाताळण्यास्तव २ वरिष्ठ सल्लागारांच्या मानधनावरील रु.५,५४,४००/- (अधिक कर) इतक्या मासिक आवर्ती खर्चास दिनांक १९ सप्टेंबर, २०२३ या कालमर्यादेपर्यंत सामान्य प्रशासन विभाग, (माहिती तंत्रज्ञान) यांच्या दिनांक २४/०४/२०२३ च्या परिपत्रकान्वये प्रकल्प अंमलबजावणी समितीने प्रशासकीय मान्यता दिली.

ब) संचालनालय, लेखा व कोषागारे यांचेमार्फत कार्यान्वित संगणकीय प्रणालींच्या सर्व समावेशक तांत्रिक बाबी हाताळण्यास्तव २ वरिष्ठ सल्लागार उपलब्ध करुन देण्यासाठी वरील कालावधीमध्ये M/s KPMG या संस्थेची निवड करण्यास प्रकल्प अंमलबजावणी समितीने मान्यता दिली.

## Agenda- 3

**संचालनालय लेखा व कोषागारे नवीन प्रशासकीय भवन, ११ वा मजला, टिसीएल प्रभादेवी (DC Site) व टिसीएल हैदराबाद (DR Site) या तीन ठिकाणी कार्यान्वित असलेल्या भारत संचार निगम लि., मुंबई यांचे MPLS Connectivity करिता सन २०२३-२४ (दि.०१.०४.२०२३ ते दि.३१.०३.२०२४) या कालावधीतील आवर्ती खर्च रु.१३,६१,०००/- (करांसहीत) इतक्या रकमेस मान्यता मिळण्याबाबत.**

अपर मुख्य सचिव (ले. व को.) वित्त विभाग यांचेकडून प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या मान्यतेस्तव खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

संचालनालय लेखा व कोषागारे यांच्या अधिनस्त (१) सर्व ३४ कोषागार कार्यालये, (२) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, (३) संचालनालय लेखा व कोषागारे नवीन प्रशासकीय भवन, ११ वा मजला, (४) टिसीएल प्रभादेवी (DC Site) व (५) टिसीएल हैदराबाद (DR Site) अशा एकुण ३८ ठिकाणी भारत संचार निगम लि. मुंबई यांचेकडून MPLS Connectivity घेण्यात आली आहे. दरवर्षी MPLS Connectivity च्या खर्चाचे आगाऊ प्रदान भारत संचार निगम लि. मुंबई यांना करण्यात येते. सद्य:स्थितीत उपरोक्त नमूद एकुण ३८ ठिकाणांपैकी ३५ कोषागार कार्यालये Web Based Central Server ला जोडण्यात आली आहेत. त्यामुळे (१) संचालनालय लेखा व कोषागारे नवीन प्रशासकीय भवन ११ वा मजला, (२) टिसीएल प्रभादेवी (DC Site) व (३) टिसीएल हैदराबाद (DR Site) या ३ ठिकाणी MPLS Connectivity कार्यान्वीत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठिकाण /कार्यालयाचे नाव | MPLS Connectivity |
|---|---|---|
| १ | टिसीएल प्रभादेवी (DC Site) | ८ mbps |
| २ | संचालनालय लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ११ वा मजला | २५६ kbps |
| ३ | टिसीएल हैदराबाद (DR Site) | ५१२ kbps |

चालू वित्तीय वर्ष २०२३-२४ मध्ये दि.०१.०४.२०२३ ते दि.३१.०३.२०२४ या कालावधीकरिता उपरोक्त ३ ठिकाणी पुरविण्यात येणाऱ्या भारत संचार निगम लि. मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या MPLS Connectivity च्या खर्चाच्या ३ बिजकांचा (Leased Circuit Bill/Tax Invoice) तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | MPLS Connectivity | खाते क्रमांक | बिजक क्रमांक/ दिनांक | एकूण रक्कम रुपये (करांसहीत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | टिसीएल प्रभादेवी (DC Site) | ८ mbps | ७०००३७५३७० | NDCMH२२००१३३ ७६८/१८.०१.२०२३ | ७७९२७२.०० |
| २ | संचालनालय लेखा व कोषागारे, न. प्र. भ., ११ वा मजला | २५६ kbps | ७०००१४३००४ | NDCMH२२००१३१ २६१/१८.०१.२०२३ | २५२७४४.०० |
| ३ | टिसीएल हैदराबाद (DR Site) | ५१२ kbps | ७००००७६०८९ | NDCTS२२०००६२७ ९९/१८.०१.२०२३ | ३२८९८४.०० |
| | | | | **एकूण** | **१३६१०००.००** |

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ भाग पहिला, उपविभाग-दोन मधील अ.क्र.२७-अ नियम क्र.७६ अन्वये नवीन संगणक यंत्रणा खरेदी करणे आणि/किंवा सध्या उपलब्ध असलेल्या संगणक यंत्रणणेत वाढ/ई-गव्हर्नन्स यंत्रणा इ. त्याची श्रेणीवाढ करण्यास मंजूरी देणे यासाठी विभाग प्रमुखांना रुपये ४.० लक्ष पर्यंतचे वित्तीय प्राधिकार असून प्रशासकीय विभागास पूर्ण अधिकार आहेत.

सदर बाबीवरील खर्च मागणी क्रमांक जी-५, प्रधान लेखाशीर्ष २०५४ कोषागारे व लेखा प्रशासन, (००)(०९७) कोषागार आस्थापना, (००)(०२) संगणकावरील खर्च, (२०५४-०२०-९), १७ संगणकावरील खर्च या शिर्षाखालील सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षामध्ये उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येणार येईल.

**निर्णय**

संचालनालय लेखा व कोषागारे नवीन प्रशासकीय भवन, ११ वा मजला, टिसीएल प्रभादेवी (DC Site) व टिसीएल हैदराबाद (DR Site) या तीन ठिकाणी सन २०२३-२०२४ करिता म्हणजे दि.०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीसाठी MPLS Connectivity स्थापित करण्यास व त्यासाठी होणाऱ्या रु.१३,६१,०००/- (करांसहीत) इतक्या खर्चाच्या रकमेस प्रकल्प अंमलबजावणी समितीने प्रशासकीय मान्यता दिली.

## Agenda- 4

**वित्त विभाग (खुद्द) करीता नवीन संगणक, प्रिंटर्स व स्कॅनर्स खरेदीबाबत.**

वित्त (खुद्द) विभागात सद्य:स्थितीत गट-अ ते गट-क संवर्गात सुमारे ३८४ पदे मंजूर आहेत. मंजूर पदांनुसार सर्व अधिकारी /कर्मचाऱ्यांना स्वतंत्र संगणक पुरविण्यात येतात. तसेच प्रत्येक अधिकाऱ्यास व कार्यासनास प्रत्येकी एक प्रिंटर व आवश्यकतेनुसार स्कॅनर्स उपलब्ध करुन दिलेले आहेत.

विभागातील संगणकाचा आढावा घेण्यात आला असून, विभागात एकूण ३१८ संगणक, १४९ प्रिंटर्स, १४ स्कॅनर्स वापरात आहेत. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक १ ऑगस्ट, २०११ नुसार, संगणक, प्रिंटर, लॅपटॉप, सर्व्हर व इतर आयटी उपकरणांचे वयोमान ५ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार सन २०१३ ते २०१७ या कालावधीतील खरेदी केलेले १६० संगणक, ७५ प्रिंटर्स व १४ स्कॅनर हे पाच वर्षापूर्वीचे असून, सध्या निर्लेखित करण्यास पात्र आहेत.

विभागातील विविध कार्यासनांकडून त्यांच्या बिघडलेल्या संगणकांऐवजी नवीन संगणक देण्याची मागणी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संगणक कक्षाकडे Reserve Stock असणे आवश्यक आहे. संगणक कक्षाकडे आता कोणतीही नवीन संगणकसामुग्री उपलब्ध नाही. त्यामुळे नादुरुस्त संगणक निर्लेखित करुन त्याऐवजी नवीन संगणक उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही.

या बाबी विचारात घेता नवीन संगणक खरेदी करण्याची नितांत आवश्यकता आहे. कार्यासनांची मागणी व संगणक कक्षास आवश्यक असलेला राखीव साठा विचारात घेता, विभागासाठी खालीलप्रमाणे संगणक सामुग्री आवश्यक आहे.

| अ. क्र. | तपशील | मागणीपत्रानुसार आवश्यक नग | राखीव साठा नग | एकूण नग |
|---|---|---|---|---|
| १ | संगणक (HP) | ३२ | १० | ४२ |
| २ | प्रिंटर्स (Laser) | २३ | ५ | २८ |
| ३ | स्कॅनर्स | ८ | २ | १० |

**प्रस्ताव**

वित्त विभाग (खुद्द) करीता खालीलप्रमाणे संगणक सामुग्री खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या अंदाजीत रु. ४३,००,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळावी.

| अ. क्र. | तपशील | आवश्यक नग | किंमत प्रति नग (रुपये) | एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | संगणक (HP) | ४२ | ७८,०००/- | ३२,७६,०००/- |
| २ | प्रिंटर्स (HP) (Laser) | २८ | २५,०००/- | ७,००,०००/- |
| ३ | स्कॅनर्स (HP) | १० | ३१,५००/- | ३,१५,०००/- |
| | | एकूण | | रुपये ४२,९१,०००/- |

**निर्णय**

समितीने खालीप्रगाणे संगणक सामुग्री GEM Portal व्दारे खरेदी करण्यास खालील अटींनुसार मान्यता दिली.

१.रुपये ३८,९९,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

२.संगणक आणि स्कॅनर्स माहिती तंत्रज्ञान विभागाच्या Specification नुसार खरेदी करण्यात यावेत.

३.लेझर प्रिंटरचे Specification माहिती तंत्रज्ञान विभागाकडून मान्य करुन घेऊन, त्यानुसार प्रिंटर्स खरेदी करण्यात यावेत.

| अ. क्र. | तपशील | आवश्यक नग | किंमत प्रति नग (रुपये) | एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | संगणक (HP) | ४२ | ७२,०००/- | ३०,२४,०००/- |
| २ | प्रिंटर्स (HP) (Laser) | २८ | २०,०००/- | ५,६०,०००/- |
| ३ | स्कॅनर्स (HP) | १० | ३१,५००/- | ३,१५,०००/- |
| | | एकूण | | रुपये ३८,९९,०००/- |

उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

**(शैला ए.)**

**सचिव (वि. सु.), तथा अध्यक्ष,**

**प्रकल्प अंमलबजावणी समिती.**